2025 III 17 - 1100

२०२५ . ०३ . १७ - ११००

# N 870

Seat No.
बैठक क्र. | | | | | | | |

Time : 2 Hours SOCIAL SCIENCES (73) GEOGRAPHY PAPER–II (M)

वेळ - २ तास सामाजिक शास्त्रे (७३) भूगोल पेपर-२ (म)

(REVISED COURSE)

Pages - 8 Total Marks : 40

पृष्ठे - ८ एकूण गुण - ४०

---

सूचना :—

(1) *सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे.*

(2) *उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*

(3) *प्रश्न क्रमांक 4(अ) साठी पुरविण्यात आलेल्या ब्राझील नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

(4) *प्रश्न क्रमांक 6(अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.*

(5) *नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.*

(6) *प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या, आलेख काढावेत.*

(7) *प्रश्नांचे उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.*

(8) *आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.*

(9) *पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.*

P.T.O.

# 2/N 870

**1. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा :** **4**

(1) भारत व ब्राझील या देशाची राजवट .............................. प्रकाराची आहे.

(*i*) लष्करी

(*ii*) साम्यवादी

(*iii*) प्रजासत्ताक

(*iv*) अध्यक्षीय

(2) हिमालयामुळे उत्तरेकडून येणारे ......................... वारे अडविले जातात.

(*i*) अतिथंड

(*ii*) अतिउष्ण

(*iii*) उष्ण व कोरडे

(*iv*) बाष्पयुक्त

(3) ब्राझील देशाची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने ...................... व्यवसायावर अवलंबून आहे.

(*i*) प्राथमिक

(*ii*) द्वितीयक

(*iii*) तृतीयक

(*iv*) चतुर्थक

(4) ब्राझीलचा क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगात ........................ क्रमांक आहे.

(*i*) पाचवा

(*ii*) सातवा

(*iii*) सहावा

(*iv*) चौथा

**2. वेगळा घटक ओळखा :** **4**

(1) क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य :

(*i*) प्रश्नावली

(*ii*) कॅमेरा

(*iii*) संगणक

(*iv*) नोंदवही

(2) ब्राझीलमधील नद्या :

(*i*) ॲमेझॉन

(*ii*) पॅराग्वे

(*iii*) उरुग्वे

(*iv*) गंगा

(3) प्राथमिक व्यवसाय :

(*i*) शेती

(*ii*) खाणकाम

(*iii*) पर्यटन

(*iv*) मत्स्य व्यवसाय

(4) वस्त्यांच्या केंद्रीकरणासाठी प्रमुख घटक :

(*i*) पाण्याची उपलब्धता

(*ii*) प्रतिकूल हवामान

(*iii*) सुपीक जमीन

(*iv*) अनुकूल हवामान

**3. चूक की बरोबर ते सांगा (कोणतेही *चार*) : 4**

(1) भारतातील लोकसंख्येत तरुणाईचे प्रमाण जास्त आहे.

(2) ब्राझील व भारत या दोन्ही देशात एकावेळी समान ऋतू असतात.

(3) मॅनॉस हे निग्रो व ॲमेझॉन या नद्यांच्या संगमावरील बंदर आहे.

(4) ब्राझीलमध्ये लिंगगुणोत्तर जास्त आहे.

(5) ब्राझील हा वाघ व सिंह हे दोन्ही प्राणी असणारा जगातील एकमेव देश आहे.

**4. (अ) तुम्हास पुरविलेल्या ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा व चिन्हांची सूची तयार करा (कोणतेही *चार*) : 4**

(1) पंपास

(2) माराजॉ बेट

(3) ब्राझीलची राजधानी

(4) पिको दी नेब्लीना

(5) पॅराना नदी

(6) मारान्हाओ राज्य

**(आ)** **दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही *चार*) :** **4**




**प्रश्न :**

(1) वरील नकाशा काय दर्शवितो ?

(2) भारतातील सर्वात दक्षिणेकडील टोक कोणते ?

(3) भारतातील पूर्व-पश्चिम अंतर किती आहे ?

(4) भारताची प्रमाणवेळ कोणत्या रेखावृत्तावरून निश्चित केली आहे ?

(5) भारताच्या पश्चिमेला कोणता समुद्र आहे ?

**5. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही *दोन*) :** **6**

(1) हिमालयातील नद्या बारमाही वाहतात.

(2) ब्राझीलमध्ये उष्णकटिबंधीय वादळे कमी प्रमाणात होतात.

(3) ईशान्य ब्राझीलमध्ये वस्त्या विरळ आहेत.

(4) ब्राझीलमध्ये जलमार्गाचा विकास झालेला नाही.

**6. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख काढा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

**भारत—साक्षरता प्रमाण (1981 ते 2016)**

| **वर्ष** | **साक्षरता (टक्केवारी)** |
|---|---|
| 1981 | 40.8 |
| 1991 | 48.2 |
| 2001 | 61.0 |
| 2011 | 69.3 |
| 2016 | 72.2 |

**प्रश्न :**

(1) वरील आलेख काय दर्शवितो ?

(2) 1991 साली भारताची साक्षरता किती होती ?

(3) 1991 ते 2001 या दशकात भारताच्या साक्षरतेत किती टक्क्यांनी वाढ झाली आहे ?

किंवा

(आ) दिलेल्या आकृतीचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 6




स्थूल अंतर्देशीय उत्पादनात व्यवसायनिहाय योगदान (2016)

व्यवसायात कार्यरत असणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी (2016)

**प्रश्न :**

(1) प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी कोणत्या देशात जास्त आहे ?

(2) स्थूल आंतरदेशीय उत्पादनात कोणत्या देशात तृतीयक व्यवसायांचे योगदान जास्त आहे ?

(3) स्थूल आंतरदेशीय उत्पादनात द्‌वितीयक व्यवसायांचा हिस्सा कोणत्या देशात जास्त आहे ?

(4) ब्राझीलमध्ये कोणत्या व्यवसायात जास्त लोकसंख्या कार्यरत आहे ?

(5) स्थूल आंतरदेशीय उत्पादनात तृतीयक व्यवसायातील ब्राझीलचे योगदान भारतापेक्षा कितीने जास्त आहे ?

(6) भारतात तृतीयक क्षेत्रातील कार्यरत लोकसंख्येची टक्केवारी किती ?

**7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) : 8**

(1) क्षेत्रभेट म्हणजे काय ? क्षेत्रभेटीची पूर्वतयारी कशी कराल ?

(2) स्वातंत्र्योत्तर काळात भारत आणि ब्राझील या देशांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले ?

(3) ब्राझील व भारताला कोणत्या पर्यावरणीय समस्यांना तोंड द्यावे लागते ?